"मतीमंद शाळेतील कौशल्य विकासासाठी अध्यापन कार्यनितीचे विकसन व परिणामकारता-एक अभ्यास"

शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत विद्यावाचस्पती पदवीच्या
अशंत:पूर्तीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठास सादर केलेला संशोधन आराखडा

:: संशोधिका ::
गिरी माधुरी गोविंद

:: मार्गदर्शक ::
प्रा.डॉ. पी.डी. जोशी
(M.Sc., M.Ed,SET, Ph.D.(Education)
शासकिय अध्यापक महाविद्यालय, परभणी

शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०१५-१६

प्रस्तावना :-

आजचे युग वैज्ञानिक असुन विदयार्थ्यांच्या सुप्त गुणांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न शिक्षणातुन केला जात आहे. परंतु वाढत्या औदयोगिकरणामुळे, जागतिकीकरणामुळे अपंग विदयार्थ्यांच्या समस्येमध्ये झपाटयाने वाढ होताना दिसुन येते. त्यामुळे सर्व सामान्य विदयार्थ्यांप्रमाणे मतिमंद विदयार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळुनही हा सामाजिक अन्याय मानला जाईल. म्हणुन मतिमंद विदयार्थ्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे प्रगती करण्यासाठीची संधी उपलब्ध करुन देणे हेच शिक्षणाचे सर्वांगीकरण होय.

विदयार्थ्यांच्या बौद्धीक विकासाच्या अभावामुळे विदयार्थ्यांच्या विकासावर होणारे दुष्परिणाम व त्या विदयार्थ्यांच्या बौद्धीक पातळीच्या भिन्नतेमुळे शिक्षण देताना येणाऱ्या समस्या व तसेच विशेष सुविधा अभ्यासक्रम, साहित्य या सर्व प्रक्रियेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे अपंग, दुर्बल, मानसिक, बौद्धीक दौर्बल्य असणाऱ्या विदयार्थ्यांसाठी ज्या विशेष अपंग शाळा चालविल्या जातात त्या मतिमंद शाळेमधील समस्यांचा शोध घेणे गरजेचे आहे. त्यासाठी सदरील संशोधन हाती घेण्यात आले आहे.

शासनाने मतिमंद विदयार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. परंतू महाराष्ट्रात एकूण अपंग विदयार्थ्यांच्या प्रमाणाचा विचार करता मतिमंद शाळेची उपलब्धता अत्यल्प आहे. तसेच दिल्या जाणाऱ्या सुविधा ह्या अल्प स्वरुपाच्या असुन शिक्षित व प्रशिक्षीत तज्ञ अध्यापक वर्गाची कमतरता जाणवते तसेच अज्ञानी व अडाणी व दरिद्री पालकांच्या दुर्लक्षामुळे मतिमंद विदयार्थ्यांच्या शिक्षणामध्ये विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

अपंग शिक्षणाच्या प्रचारासाठी केंद्र व राज्य शासन यांनी १९९५ साली समान संधी व संरक्षण हक्क संपूर्ण अधिनियम २००१ महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा तयार करण्यात आला असुन अपंगांचे शैक्षणिक प्रगतीसाठी विविध योजना. प्रगती

कार्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला. एवढेच नाही तर अपंग शिक्षणाच्या नवनविन संकल्पना राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरीपण विशेष मतिमंद अपंग शाळा चालवित असताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्येचा शोध घेण्यासाठी सदरील संशोधनामध्ये शास्त्रीय पद्धतीने मतिमंद शाळेच्या समस्यांचा शोध घेवून उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विदयार्थ्यांच्या अध्यापनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याचप्रमाणे संपादणूकीक चाचणीचा उपयोग करुन समस्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच मतिमंद शाळेतील मतिमंद विदयार्थ्यांसाठी कौशल्य विकासाच्या अध्यापनासाठी नविन प्रणाली विकसीत केली जाणार आहे.

गरज व महत्व :-

भारतीय राज्यघटनेनुसार प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळणे गरजेचे असुन मतिमंद प्राथमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही त्याकडे शासनाने विशेष अपंग शाळांची नियुक्ती करण्यात आली. परंतु त्या शाळा चालवित असतांना शाळेमध्ये विविध समस्यांना सामोरे जावे लागते. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करत असतांना विविध अडचणी निर्माण होत असुन त्यामुळे मतिमंद शिक्षणाची भावी काळातील गरज लक्षात घेवून येणाऱ्या विविध अडचणी व समस्या शोधुन शिक्षणाचे सार्वत्रीकरण केले पाहिजे.

मतिमंद शाळेतील विदयार्थ्यांना पालकांचे सहकार्य अपंगत्वाच्या प्रमाणात शिक्षणाची सुविधा, आधुनिक कौशल्याचे ज्ञान तसेच सेवाभावी सामाजिक संस्थेचे सहकार्य जीवन उपयोगी कौशल्याचा विकास करणे या सर्व दृष्टिने अभ्यास करणे

समस्या सोडविणे गरजेचे असुन त्या करिता शिक्षणाचा गुणात्मक दर्जा व कौशल्य विकसीत करण्यासाठी सदरील संशोधन हाती घेण्यात आले आहे.

मतिमंद विदयार्थ्यांना विशेष मतिमंद शाळेत शिक्षण देणे एक आव्हान असुन मतिमंद विदयार्थ्यांच्या मतिमंदत्वाच्या भिन्नतेमुळे त्यांना विविध कौशल्य व शिक्षण देणे गरजेचे ठरत असते. त्याकरिता विशेष सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे असून त्यासाठी पालकांचे सहकार्य, शासनाचे अनुदान, शाळेतील भौतिक सुविधा, सामाजिक व सेवाभावी संस्थेचे सहकार्य या विविध घटकांचा समावेश शाळा चालत असताना महत्वाचा असतो. परंतु विशेष्ज्ञ मतिमंद शाळा चालवत असतांना शाळेमध्ये विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्येचा शोध घेऊन त्या दुर करण्यासाठी विविध उपाय योजना शोधण्याचा या संशोधनातून प्रयत्न करण्यात येणार आहे.

या संशोधनामध्ये मतिमंद शिक्षणांच्या सार्वत्रिकरणास सहकार्य लागते.

१. मतिमंद विकलांग विदयार्थ्यांची समस्या कळते.
२. मतिमंद विदयार्थ्यांच्या कौटूंबिक परिस्थितीची जाणीव होते.
३. आर्थिक समस्या शोधली तरी सामाजिक व सेवाभावी संस्थेच्या सहकार्याचा आवाज घेण्यात येईल.
४. शाळेतील भौतिक सुविधांचा शोध घेता येईल.
५. शाळेतील विविध सुविधांचा समस्यांचा शोध घेता येईल

या संशोधनातुन मतिमंद विदयार्थ्यांच्या विशेष शाळांच्या समस्येचा शोध घेऊन त्यावर उपाय सुचविल्यामुळे मतिमंद विदयार्थ्यांच्या शिक्षणाचे सार्वत्रिकरण होण्यास मदत होईल. अशी अपेक्षा आहे.

संशोधन समस्या

मतीमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी अध्यापन कार्यनितीचे विकसन व परिणाम कारकता –एक अभ्यास

कार्यात्मक व्याख्या

१) मतीमंद विद्यार्थी

लातूर जिल्हयातील शासकिय व अशासकीय संस्थामार्फत चालवल्या जाणा-या विशेष निवासी शाळेतील विद्यार्थी ज्याचा शारीरिक विकासाच्या तुलनेत मानसीक विकास कमी झलेला आहे.

२) कौशल्य विकास

मतीमंद विद्यार्थीमंध्ये भाषा,लेखन,वाचन,संवेदना,स्पर्श,खेळ इत्यादी कौशल्यामध्ये झालेला सकारात्मक बदल म्हणजे कौशल्य विकास होय.

३) अध्यापन कार्यनितीचे विकसन –

मतीमंद विद्यार्थीमंध्ये कौशल्य विकासासाठी शासनाने निश्चित केलेल्या अध्यापन पध्दती व्यतिरिक्त अधिक नाविण्यापूर्ण व क्रतीयुक्त अध्ययन पध्दतीची निर्मिती व संच म्हणजेच अध्यापन कार्यनितीचे विकसन होय.

संशोधनाची उदिष्टये –

१) लातुर जिल्हायातील मतिमंद विद्यार्थ्यांनसाठी चालवल्या जाणाया विशेष निवासी शाळांचा शोध घेणे.

२) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळातील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाच्या सद्यस्थितीचा शोध घेणे.

३) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळातील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या अध्यापन पध्दतीचा शोध घेणे.

४) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी नाविण्यपूर्ण अध्यापन कार्यनीती संचाची निर्मिती करणे.

५) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी नाविण्यपूर्ण अध्यापन कार्यनीती संचाची परिणामकारकता तपासणे.

६) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी निर्मित अध्यापन कार्यनितीचा तुलनात्मक अभ्यास.

७) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी निर्मित अध्यापन कार्यनीती विषयी शिक्षकांची प्रतिक्रीया जानणे.

८) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी निर्मित नाविण्यपूर्ण कार्यनीतीच्या प्रभावी अमलबजावणीसाठी शिफारसी सूचवने.

ग्रहितके –

१) शिक्षकांची चांगली अध्यापनक्षमता आणि मतिमंद विद्यार्थ्यांतील सामाजिक कौशल्य विकास यात सकारात्मक संबंध जोडला आहे. क्वीस्ट, एच.ओ.ओ.नॉइको एस.ओ.आणि डेकूपी, २००७)

२) संगणक वापरामुळे मतिमंद विद्यार्थ्यांच्या भाषीक कौशल्यामध्ये सकारात्मक बदल होतो. इमान फराग, २००३)

३) दहा आठवडयाच्या शब्द उच्चारण्याच्या प्रशिक्षणामुळे मतिमंद मुलांचे भाषीक कौशल्य व शब्द उच्चारण्याचे कौशल्य यात धनात्मक परिणाम जाणवतो एम.कॉनर्स व इतर २००६)

परिकल्पना –

१) संधोधन परिकल्पना –

१) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी शाळा, शिक्षक व शासनाकडून सकारात्मक प्रयत्न करण्यात येतात.

२) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या सर्व कौशल्याचा योग्य प्रमाणात विकास झाला आहे.

३) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी परिणामकारक अध्यापन पध्दती वापरल्या जातात.

२) शुन्य परिकल्पना –

१) लातुर जिल्हायातील विशेष निवासी शाळांतील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी राबविण्यात आलेली पारंपारीक अध्यापन पध्दती आणि नाविण्यपुर्ण कार्यनीती संचाच्या परिणामकारकतेतून सार्थ फरक आढळून येत नाही.

२) नियंत्रीत व प्रयोगीक गटाच्या पूर्व चाचणीतील गुणामध्ये सार्थ फरक नाही.

३) नियंत्रीत व प्रयोगीक गटाच्या उत्तर चाचणीतील गुणामध्ये सार्थ फरक नाही.

४) नियंत्रीत व प्रयोगीक गटातील मुलांच्या पूर्व चाचणीतील गुणामध्ये सार्थ फरक नाही.

५) नियंत्रीत व प्रयोगीक गटातील मुलींच्या पूर्व चाचणीतील गुणामध्ये सार्थ फरक नाही.

६) नियंत्रीत व प्रयोगीक गटातील मुलांच्या पूर्व चाचणीतील गुणामध्ये सार्थ फरक नाही.

५) नियंत्रीत व प्रयोगीक गटातील मुलींच्या उत्तर चाचणीतील गुणामध्ये सार्थ फरक नाही.

व्याप्ती –

आशय व्याप्ती –

हे संशोधन मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी संबंधीत आहे॰

घटक व्याप्ती –

हे संशोधन मतिमंद विद्यार्थ्यांच्या सहा कौशल्यांशी संबंधीत आहे.

क्षेत्र व्याप्ती –

हे संशोधनासाठी लातूर जिल्हायातील निवासी मतिमंद शाळांचा विचार करण्यात येणार आहे.

काल व्याप्ती –

हे संशोधन २०१५ ते २०१७ या दरम्यान पूर्ण केले जाईल.

मर्यादा –

आशय मर्यादा –

हे संशोधन मतिमंद विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातून विकसीत होणाऱ्या कौशल्यांशी मर्यादीत आहे.

घटक मर्यादा –

हे संशोधन अभ्यासक्रमात नमूद केलेल्या सहा कौशल्य विकास घटकापूरतेच अमर्यादीत आहे.

क्षेत्र मर्यादा –

हे संशोधन लातूर जिल्हयातील विशेष मतिमंद शाळेपूरतेच मर्यादीत आहे.

काल मर्यादा –

हे संशोधन २०१५ ते २०१७ यापूरतेच मर्यादीत आहे.

परिमर्यादा –

१) या संशोधनासाठी लातुर जिल्हयात असलेल्या विशेष मतिमंद शाळांतील दहा शाळांचा समावेश प्रायोगीक संशोधन पध्दतीत करण्यात येणार आहे.

२) लातुर जिल्हयातील मतिमंद विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास अंतर्गत लेखन,वाचन,श्रवण,भाषण या कौशल्यांचा अंर्तभाव करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती –

हे संशोधन पूर्णत्वास येण्यासाठी बहूसंशोधन पध्दतीचा वापर करण्याचे संशोधकीने ठरवीले आहे॰ या संशोधनामध्ये वर्णनातमक संशोधन पध्दतीतील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा व प्रायोगीक संशोधन पध्दतीतील व्दिगट अभिकल्पाचा वापर करण्याचे ठरविले आहे.

या संशोधनातील वेगवेगळे उदिष्टये वेगवेगळया संशोधन पध्दती वापरण्यास पूरक ठरत असल्यामुळे संशोधिकेला एकापेक्षा अनेक पध्दती पूर्णत्वास नेमण्यासाठी वापराव्या लागत आहेत.

नमुना निवड –

लातूर जिल्हयातील दहा मतिमंद शाळा मतिमंद विद्यार्थ्यासाठी चालविण्यात येतता हि या संशोधनाची जनसंख्या आहे उदिष्ट २ व ३ च्या पूर्ततेसाठी सर्वच शाळांची निवड नमुना म्हणून करण्यात येईल. उदिष्ट क्र. ५ व ७ च्या पूर्ततेसाठी सहेतूक नमूना निवड पध्दतीव्दारे एकत्र नियंत्रीत पाच शाळा व प्रायोगीक पाच शाळा निवडण्यात येतील

प्रसांगीक नमूना निवड पध्दतीव्दारे नाविन्यपूर्ण अध्यापन कार्यनिती राबविण्यात आलेल्या पाच शाळामधील शिक्षकांची निवड त्यांची प्रतिक्रीया जाणून घेण्यासाठी करण्यात येईल.

संशोधनाची साधने –

सदरील संशोधनाची माहिती गोळा करण्यासाठी खालील संशोधन साधनांचा वापर करण्याचे ठरविले आहे.

१) मतीमंद विद्यार्थ्याची कौशल्य विकास शोधीका

२) कौशल्य विकास अध्यापन पध्दती शोधीका

३) कौशल्य विकासासाठी नाविण्यपूर्ण कार्यनीती संच

४) शिक्षक मतावली

संख्याशास्त्रीय परिमाण –

सदर संशोधनासाठी गोळा करण्यात आलेल्या माहीतीचे विश्लेषण करण्यासाठी खालील संख्याशास्त्रीय परिमानांचा वापर करण्यात येईल.

१) मध्यमान

२) प्रमान विचलन

३) सहसबंधक गुणांक

४) ANCOVA

संशोधनाची कार्यवाही –

१) प्रथम संबंधित साहित्याचा आढावा व समस्येची निश्चिती करण्यात येईल

२) समस्या व उद्दिष्टांनुरूप नमुना कार्यपध्दती व प्रायोगिक अभिकल्प निश्चित केले जाईल.

३) साधन निर्मितीसाठी शिक्षक यांच्यासाठी प्रश्नावली तयार केली जाईल.

४) माहिती संकलन साधनांचे चाचणी प्रामाणिकरणाच्या टप्प्याव्दारे प्रमाणिकरण करण्यात येईल.

५) प्रायोगिक कार्यवाही आणि माहितीचे संकलन केले जाईल.

६) संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

७) मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण लिहून ते तपासून चुकांची दुरूस्ती केली जाईल.

८) प्रबंधाची बांधणी करून मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेवून पाच प्रती विद्यापीठात सादर केल्या जातील.

प्रबंधाची प्रकरण योजना –

१) प्रस्तावना

२) संबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा

३) संशोधनाची कार्यपध्दती

४) माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन

५) निष्कर्ष व शिफारशी

कार्यसूची वेळापत्रक –

अ.क्र.	विवरण	कालावधी
१.	संशोधन विषय निश्चत करणे	६ महिने
२.	संशोधन साहित्याचा पूर्व आढावा घेणे	४ महिने
३.	संशोधन साधने तयार करणे व प्रमाणित करणे	१२ महिने
४.	माहिती संकलित करणे	६ महिने
५.	माहितीचे विश्लेषण करणे	२ महिने
६.	प्रबंध टंकलिखित करणे	२ महिने
७.	शोधप्रबंध विद्यापिठात सादर करणे	१ महिने
	एकूण	**३३ महिने**

अंदाजपत्रक –

अ.क्र.	विवरण	कालावधी
१.	पिएच.डी. प्रवेश शुल्क	१५०००/-
२.	संबंधित साहित्याचा आढावा	१००००/-
३.	प्रस्तुत पुस्तक खरेदी	२००००/-
४.	झेरॉक्स पेपर	१००००/-
५.	डी.टी.पी. टाईप	५०००/-
६.	प्रबंध पाच प्रती	५०००/-
७.	बुक बायडींग	५०००/-
८.	प्रवास खर्च	३००००/-
९.	कार्यशाळा चर्चासत्र	३००००/-
	एकूण	**१३०,०००/-**

संदर्भ ग्रंथसूची –

भितांडे वि.रा.(२००७) शैक्षणिक संशोधन पध्दती पुणे : नित्यनूतन प्रकाशन

मुळे आर.एस., उमाटे व्हि. टि. (१९९८) - शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे तिसरी आवृती , औरंगाबाद, विद्याबुकस

पारसनिस हेमलता (२००८) - शैक्षणिक संशोधन ओळख, पुणे : नित्यनूतन प्रकाशन

पाटिल जे.वाय. (१९९८) - राष्ट्रीय शिक्षण

पंडित बी.बी. (२००५) - शिक्षणातील संशोधन, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

डॉ. हेमलता काळे, - आपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र

कुंडले म.बा. सृजनशिलता (१९९१) - पुणे, नित्यनूतन प्रकाशन.

संशोधिका
गिरी माधूरी गोविंद

मार्गदर्शक
प्रा.डॉ. जोशी प्रमोद दुर्गादास
शासकिय अध्यापक महाविद्यालय,
परभणी